समाजकार्य जीवनगौरव

## गंगाप्रसाद अग्रवाल

स्थल-काल-परिस्थितीनुसार बदल केला हे फक्त पहिल्या भागापुरते म्हणता येईल. स्वातंत्र्य आंदोलनातील सहभाग संपला की, आपले कार्य संपले, असे मानणे हे खऱ्या कार्यकर्त्यांचे लक्षण नव्हे! समाजजीवनाचा प्रवाह चालू असतो. नव्या समस्या व नवी आव्हाने निर्माण होतात. त्याला जाणतेपणाने तोंड दिला पाहिजे, म्हणून मी माझा सहभाग चालू ठेवला. राष्ट्र सेवादलाचे कार्य आणि सर्वोदयचे कार्य यात मूलत: फारसा फरक नाही. सत्तेविनाही सेवा घडू शकते, हा वस्तुपाठ सेवादलाचा. मी सेवादलाच्या कार्यक्रमात रस घेत असे. पुढे मात्र विनोबांच्या सर्वोदय चळवळीचे मला आकर्षण निर्माण झाले. आर्थिक विषमता नष्ट करायची असेल, तर ग्रामीण कृषिप्रधान अर्थरचनेला व्यवस्थित समजून घेतले पाहिजे.



**गंगाप्रसाद अग्रवाल,**
वसमत, हिंगोली
Mob. 9421804581
(विशाल)


Date of Publication - 13-01-2018

# माझे एकांत व लोकांत एकाचवेळी चालू असते...

**प्रश्न –** तुमच्या घराण्यात कोणतीही राजकीय विचारप्रवाहाची परंपरा नाही. घराणे व्यापार उदीमाच्या क्षेत्रातले. तुमच्या कुटुंबात कोणी रूढ अर्थाने उच्चविद्याविभूषित असे नसतानाही ज्ञानार्जनात आणि सामाजिक कार्यात केवळ रस घेण्यापुरतीच नव्हे, तर त्यात समर्पण बुद्धीने कार्यरत राहण्याची वृत्ती तुमच्यात कशी आली. यासंबंधी काही वंशशास्त्रीय अनुमान करता येईल काय?

– अनुमानाने सहसा अचूक निष्कर्ष निघतोच असे नाही. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे आमच्या घराण्यात तशी कोणतीही परंपरा नव्हती. वडिलांची कापड दुकानदारी होती. आम्ही चौघे भाऊ. माझा क्रमांक दुसरा. माझ्या बालपणी वडिलांना कापड दुकानदार म्हणून पाहिले. त्यांचे शिक्षण फारसे झाले नव्हते. त्यांना त्या काळी काही राजकीय मते होती किंवा नाही याबद्दल मी निश्चित काही सांगू शकणार नाही. पण ते ईश्वरनिष्ठ आणि पापभीरू वृत्तीचे होते. चांगले काम केल्याने पुण्यसंचय होतो, दुसऱ्याला दुखावणे पाप आहे, अशी त्यांची विचारसरणी होती. सामाजिक न्यायाची संकल्पना समजून घेण्याएवढे त्यांचे आकलन नव्हते. तरी त्यांच्या सत्प्रवृत्तीला धार्मिक अधिष्ठान होते, त्या प्रेरणेने ते त्या वेळच्या समाजकारणात रस घेत. त्याचा परिणाम कदाचित माझ्यावर त्या वेळी झाला असावा.

**प्रश्न –** तुमच्या वडिलांनी तुमच्यासाठी विशेष परिश्रम घेऊन शिक्षणाची व्यवस्था केली की, तुमची शैक्षणिक जीवनाची जी वाटचाल झाली ती स्वयंप्रेरणेने झाली?

– हा प्रश्न स्पष्टीकरणासाठी थोडासा अडचणीचा आहे. अडचणीचा या अर्थाने की, आपल्या मुलाच्या शिक्षणाची काळजी घेणे म्हणजे त्याचा घरी नियमित अभ्यास घेणे, शाळेत काय करतो याकडे लक्ष देणे असा प्रकार त्या वेळी नव्हता. वडिलांचे शिक्षण जरी फारसे झाले नव्हते, तरी त्यांना शिक्षणात रुची होती. वडिलांवर आर्य समाजाच्या विचारांचा प्रभाव होता. त्यांना संस्कृत यावे असे वाटायचे. माझ्या आठवणीप्रमाणे येथील दत्तोपंत देऊळगांवकर वकील हे माझ्या वडिलांना भगवद्गीता म्हणायला लावायचे.

**प्रश्न –** शालेय जीवनातील काही आठवणी, ठळक प्रसंग, त्या वेळच्या गुरुजनांपैकी विशेष प्रभावी वाटणारी एखादी व्यक्ती यासंबंधी तुम्हाला काही सांगता येईल का? तुमच्यावर त्या काळात काही खडतर प्रसंग आले का?

– शालेय जीवनातील आठवणी मला फारशा सांगता येणार नाहीत. कारण आता त्या गोष्टीला फार काळ होऊन गेला आहे. आम्हाला शिकविणाऱ्यांपैकी एक बावळे मास्तरांचे नाव आठवते. त्या वेळी बहुतेक शिक्षक हे मुस्लिम असत. शाळेत असताना एका मुख्याध्यापकाची बदली झाली. त्यांच्या निरोपसमारंभात मी भाषण केले. ते माझ्या जीवनातील पहिले भाषण. सातवी पास होईपर्यंत मी माझ्या आई–वडिलांच्या छत्राखालीच होतो. आमचे कुटुंबही मोठे होते. वडिलांचा व्यवसायही बरा चालत असे. त्यामुळे त्या काळात माझ्यावर कोणतेही खडतर प्रसंग आले नाहीत. शालेय शिक्षण चालू असताना बाहेरच्या वातावरणाचा ठसा माझ्या मनावर नव्हता. राजकीय आणि सामाजिक स्थित्यंतराचा वेध घेण्याएवढी समजही अर्थात त्या वेळी नव्हती. शिकायचे, मोठे व्हायचे. नोकरी किंवा उद्योग करायचा हे ध्येय ठेवूनच मध्यमवर्गीयांची मुले शिकत. मीही त्या वेळी त्यापैकीच एक होतो. त्यामुळे शाळेत असताना निझामाला दीर्घायुरारोग्य चिंतणारी प्रार्थना म्हटली जायची. तीही मी म्हटली आहे, पुढे योगायोगाने त्याच्या विरुद्धच्या

लढ्यात सहभागी झालो!

**प्रश्न –** असे असूनसुद्धा तुम्ही तुमचा स्वतंत्र मार्ग कसा चोखाळला?

– त्याची अनेक कारणे आहेत. माझे सातवीपर्यंतचे शिक्षण वसमतला झाले. वडिलांना मी शिकावे असे फार वाटायचे, पण शिक्षणाच्या सुविधा आतासारख्या नव्हत्या. हायस्कूलसुद्धा फक्त जिल्ह्याच्या ठिकाणी असायचे. दळणवळणही आजच्या एवढे सोपे नव्हते. बाहेरगावी राहण्यासाठी कुणातरी नातलगाचे घर असावे लागे. यातून मार्ग काढण्यासाठी माझ्या वडिलांना एक युक्ती सुचली. पुढील शिक्षणासाठी नातेवाईकाचा शोध घेण्यापेक्षा माझे लग्न करावे, म्हणजे आपोआपच हा प्रश्न सुटेल व मला शिक्षणासाठी तिथे राहता येईल व त्याप्रमाणे घडलेही!

**प्रश्न –** म्हणजे शिक्षण आणि लग्न याबाबत तुमच्या संदर्भात उलट घडल्यासारखे दिसते. मध्यमवर्गीयांमध्ये शिक्षण पूर्ण झाल्याशिवाय सहसा लग्नाचा विचार कुणी करत नाही. लग्नानंतर शिक्षण घेणे शक्य होत नाही, असाच समज रूढ आहे. मग तुम्ही लग्नाला संमती कशी दिली?

– माझी संमती घेण्याचा प्रश्नच आला नाही आणि घेतली तरी अज्ञान वयातील संमतीला फारसा अर्थ नसतो. एकीकडे मला पुढचे शिक्षण मिळावे ही वडिलांची तीव्र इच्छा व दुसरीकडे त्यासाठी मला एकटे कुठे न ठेवण्याचा आग्रह. यामुळे ते विचित्र परिस्थितीत सापडले. शेवटी माझ्या पुढील शिक्षणासाठी माझे लग्न करणे, हाच तोडगा त्यांना योग्य वाटला व त्यांनी जालन्याच्या एका गरीब कुटुंबातील मुलीशी माझा विवाह केला. शिक्षणासाठी सासुरवाडीला राहण्याचा योग मला वाटते कुणाच्या जीवनात येत नसावा किंवा आला असेल तर फार थोड्यांच्या नशिबी ते भाग्य येत असावे. पण का, कोण जाणे एक वर्षापेक्षा अधिक काळ माझे मन तिथे रमले नाही. आठवीचे एक वर्ष मी कसेबसे काढले व अन्यत्र कोठेतरी चांगल्या ठिकाणी सोय व्हावी, असे वाटत असतानाच अंबाजोगाईच्या योगेश्वरी नूतन विद्यालयाचे नाव समोर आले आणि मी तिथे राहू लागलो.

**प्रश्न –** अंबाजोगाईला राहण्याचे कसे ठरले? तिथे राहण्याचा योग कुणामुळे आला? त्याचा तपशील आपण सांगू शकाल काय?

– तपशिल फारसा विस्ताराने सांगता येणार नाही, पण आठवेल तेवढा सांगतो. कारण त्या गोष्टीला आता सुमारे साठ-पासष्ट वर्षे झाली आहेत. माझी सोय अंबाजोगाईला कशी झाली, त्यापूर्वी त्या वेळची राजकीय व सामाजिक परिस्थिती कशी होती, हा संदर्भही थोडासा लक्षात घेणे जरूर आहे. देशाच्या पातळीवर स्वातंत्र्याचा लढा ऐन भरात होता. ठिकठिकाणी सत्याग्रहाचे लढे सुरू होते. गांधीजींनी आपले आंदोलन तीव्र केले होते. हैदराबाद राज्यातही काँग्रेसशिवाय इतर संघटनांतर्फे सत्याग्रह चालूच होते. त्यात आर्य समाज, हिंदू महासभासारख्या संघटना अग्रेसर होत्या. अशा पार्श्वभूमीवरच अंबाजोगाईची शाळा स्थापन झाली होती.

तो काळ १९३८-३९ चा होता. संबंध देशाचे वातावरण स्फोटक होते. स्वातंत्र्य आंदोलन म्हणजे काय याची तोंडओळख मला खऱ्या अर्थाने अंबाजोगाई येथे झाली. ब्रिटिशांची सत्ता झुगारली पाहिजे आणि त्यासाठी गांधीजींनी सुरू केलेल्या लढ्यात सहभागी झाले पाहिजे. अशा विचाराची रुजवात माझ्या मनात याच काळात झाली.

**प्रश्न –** आतापर्यंत आपण जे सांगितले त्यावरून अंबाजोगाईच्या वास्तव्यात तुमच्या विचाराला काही बैठक मिळण्यात आणि आकलनाच्या कक्षा रुंदावण्याला मदत झाली असे दिसते. अंबाजोगाईचे दिवस म्हणजे तुमच्या विद्यार्थी जीवनातले मंतरलेले दिवस म्हणायला हरकत नाही, असेच ना?

– होय. ते मंतरलेले दिवस होते आणि आत्मपरीक्षणाचेही दिवस होते. बाबासाहेब परांजपे यांचे भाषण ऐकले आणि माझ्या जीवनाला त्यामुळे एक कलाटणीच मिळाली. यांचे वक्तृत्व प्रभावी होते. त्या वेळी त्यांची वाणी ब्रिटिश सत्तेविरुद्ध आग ओकीत होती. मराठवाडा तर दुहेरी पारतंत्र्यात होता. निझामाची राजवट जुलमी आणि धर्मांध होती. अशा परिस्थितीत माझा बाबासाहेबांशी संपर्क आला. ते त्या वेळी शिक्षण संस्थेचे काम अत्यंत नेटाने आणि निष्ठेने करत होते. खासगी शाळा चालवणे हे त्या वेळी मोठे व्रत होते. सरकारी शाळा त्यासुद्धा थोड्या होत्या. शिक्षकांत मुसलमानांचा भरणा अधिक असे. मुस्लिम सणांना सुट्ट्या असत. मोहरमची सुट्टी त्या वेळी दहा दिवसांची होती. शाळा तपासायला येणारे अधिकारी मुस्लिमच असत. शाळा तपासणीच्या दिवशी बाबासाहेब काळी शेरवानी घालून शाळेत यायचे. वेष आणि पेहरावाबाबतही मुस्लिम संस्कृतीचा प्रभाव

होता. शाळेत काही राजकारण चालते का, हे तपासण्यासाठी गुप्तचरांचा ससेमिरा असायचा. शाळेला त्या वेळी स्वतंत्र इमारत नव्हती. जोगेश्वरी मंदिराच्या परिसरात भाड्याच्या जागेत शाळा भरे. माझी सोय वसतिगृहात होती. वसतिगृहाचे वातावरण त्या वेळी कौटुंबिक वातावरणासारखे असे. राहण्याच्या सोईसुविधा त्या वेळी गौण मानीत. ज्ञानार्जन हे मुख्य ध्येय असे.

**प्रश्न –** आताच तुम्ही म्हणालात की, ते मंतरलेले दिवस होते. तसेच आत्मपरीक्षराचेही दिवस होते. हे आत्मपरीक्षण नेमके कशाचे व कुणी करायचे?

– हे आत्मपरीक्षण सर्वांनीच करायचे, असा तो काळ होता. कशाचे आत्मपरीक्षण असे जर तुम्ही म्हणत असाल, तर त्या वेळेला स्वातंत्र्यप्राप्तीशिवाय दुसरा विषय नव्हता. क्रांतिकारकांपासून ते विधायक कार्यकर्त्यांपर्यंत सर्वांच्या पुढे तेच ध्येय होते. देशाच्या पातळीवर अनेक घडामोडी घडत होत्या. मी अंबाजोगाईला शिकायला गेलो, त्याच्या दोन–तीन वर्षे आधीच फैजपूर काँग्रेसचे अधिवेशन महाराष्ट्रातील ग्रामीण भागात झाले होते. गांधीजींचा अहिंसात्मक असहकाराचा सरकारविरोधी कार्यक्रम प्रभाव दाखवत होता. अशा वेळी केवळ पुस्तकी शिक्षण घेणे आणि व्यक्तिगत जीवन सुखा–समाधानाचे कसे जाईल याचा विचार करणे म्हणजे क्षुद्रपणा आहे, अशी भावना तरुणांच्या मनात रुजविण्याचे काम अंबाजोगाईची शाळा करीत होती. माझ्या आत्मपरीक्षणाला या शाळेमुळे योग्य दिशा मिळाली, असे मला वाटते. आपल्या कार्यक्षेत्राची व शक्तीची तमा न बाळगता आंदोलनात स्वत:ला झोकून द्यावे व देशासाठी काही करावे असे वाटणे याला मी आत्मपरीक्षण म्हणतो आणि ते सर्वांनीच करावे असा तो काळ होता. आताही आत्मपरीक्षणाची गरज आहेच, पण त्याचा संदर्भ थोडा निराळा असेल.


**प्रश्न –** तो निराळा संदर्भ कोणता?

– तुम्हाला हे माहीत असेलच की, आधी स्वातंत्र्य का आधी सामाजिक सुधारणा हा वाद टिळक–आगरकरांच्या वेळी फार चर्चिला जायचा. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' वगैरे टिळकांचे वाक्य आज इतिहासजमा झाले आहे. त्या पुढची अवस्था 'सुराज्या'ची आहे. सुराज्याची कल्पना आणि सुराज्याची अवस्था यात आज बरेच अंतर पडले आहे. ते कमी करता येणे शक्य असेल, तर काय करायला पाहिजे, हा तो संदर्भ आहे. आर्थिक समानता, स्वावलंबन, ग्रामीण अर्थव्यवस्था, शेतीउत्पादनाचे व वितरणाचे नियोजन गेल्या साठ वर्षांत आपण यशस्वीपणे करू शकलो आहोत का याचा शोध घेणे, हा तो संदर्भ आहे. अगदी देशाच्या फाळणीच्या वेळी झाले, तसे दंगेधोपे आजही होत असतील, तर स्वातंत्र्यानंतरची ही जबाबदारी कोणाची; याचा वेध घेणे हा तो संदर्भ आहे.

**प्रश्न –** मॅट्रिकनंतर नोकरी किंवा व्यवसाय न करता पुढील शिक्षण घेण्याचा निर्णय कसा झाला?

– माझ्या वडिलांना शिक्षणाची आवड होती. आपण जरी शिक्षण घेऊ शकलो नाही, तरी आपल्या मुलांनी ते घ्यावे असे त्यांना वाटायचे. माझे थोरले बंधू हरिप्रसाद हे वडिलांसोबत घर–परंपरेच्या व्यवसायाचे धडे घेत होते. त्यामुळे मला नोकरीची निकड नव्हती. त्या वेळी वर्ध्याला एक कॉमर्स कॉलेज असल्याचे व तिथे ठाकूरदास बंग हे प्राध्यापक असल्याची माहिती बाबासाहेबांना मिळाली. ठाकूरदार बंग यांच्यावरही गांधीविचारांचा प्रभाव होता. श्रीमन् नारायण हेही गांधीवादी प्राचार्य त्या कॉलेजात होते. वर्ध्याला त्या वेळी आगळेवेगळे स्थानमहात्म्य प्राप्त झाले होते. गांधीजींचा मिठाचा सत्याग्रह होऊन गेला होता. या आंदोलनात जनमानस बरेच ढवळून निघाले होते. वर्ध्यापासून जवळच गांधीजींनी 'सेवाग्राम' आश्रमाची स्थापना केली होती. वर्ध्याला राहिल्यास शिक्षणाचीही सोय होईल व सेवाग्राममुळे कधीकाळी का होईना गांधीजींना पाहता येईल असे वाटत होते.

**प्रश्न –** वर्ध्याला आल्यानंतर तुमचे महाविद्यालयीन शिक्षण सुरू झाले. उच्चशिक्षणाची संधी ज्या काळात मराठवाड्यातील त्यातून विशेषत: ग्रामीण भागातील



विद्यार्थ्यांना नव्हती, त्या काळात तुमची एवढ्या मोठ्या ठिकाणी सोय झाली. त्यातून तुम्ही विवाहित, अशा अवस्थेत तारुण्यात पदार्पण झाल्यानंतर भावी जीवनासंबंधी जे स्वप्नरंजन असते, त्याचा काही अनुभव वा त्याबाबतच्या तुमच्या काही महत्त्वाकांक्षा त्या वेळी होत्या का?

– तुम्ही म्हणता, त्याप्रमाणे कोणत्याही महत्त्वाकांक्षांचा माझ्या मनाला स्पर्श झाला नाही. याचे कारण मी अंबाजोगाईहून येथे आलो. अंबाजोगाईचे वातावरण राष्ट्रीय भावनेने भारावलेले होते. स्वामी रामानंद तीर्थ, बाबासाहेब परांजपे व त्यांचे इतर बरेच सहकारी माझ्या पाहण्यात आले. कोणत्या ना कोणत्या निमित्ताने त्यांचे विचार ऐकण्यात आले. स्वातंत्र्याचा लढा व त्यात आपण आपला सहभाग कसा नोंदवू शकतो, एवढाच विचार त्या वेळी होता. वर्ध्याला आल्यावर त्या विचारांनाच पुष्टी मिळाली. तिथे राष्ट्रीय युवक संघटना होती. त्याचे नेतृत्त्व त्या वेळी आचार्य दादा धर्माधिकारी करत होते. त्या संघटनेशी माझा संबंध आला. परंतु महाविद्यालयाची पहिली टर्म संपल्यानंतर घरी आलो, ते दुसऱ्या वर्षी नागपूरच्या सिटी कॉलेजमध्ये दाखल होईपर्यंत घरी राहिलो. नागपूरला प्रथम वर्ष पूर्ण केल्यावर द्वितीय वर्षात चलेजाव आंदोलन झाले. तिथे १९३८ च्या सत्याग्रहात सामील झालेले अनेक जण माझे मित्र बनले. सारा परिसरच स्वातंत्र्योर्मीने झपाटलेला होता. अशा वेळी व्यक्तिगत व कौटुंबिक सुखाबाबतचे स्वप्नरंजन करण्यास मला सवडच मिळाली नाही, असे म्हटले तरी चालेल. तरी पण आपल्याला शिक्षणासाठी वडिलांनी एवढ्या दूरवर ठेवले असल्यामुळे नीट अभ्यास करणे व त्यांना त्यांचे श्रेय देणे, हे माझे कर्तव्य होते, म्हणून मी अभ्यास केला व इंटरचे पहिले वर्ष पास झालो. दुसरे वर्ष मात्र पूर्ण होऊ शकले नाही.

**प्रश्न –** त्याचे कारण?

– इंटरच्या दुसऱ्या वर्षात मी नागपूरच्या बियाणी महाविद्यालय- सिटी कॉलेजात होतो. त्याच वेळी गांधीजींनी इंग्रजांना 'चले जाव'चा इशारा दिला होता. दि. ८ ऑगस्टला मुंबईच्या आझाद क्रांती मैदानावर गांधीजींनी लढ्याचे रणशिंग फुंकले. सारे वातावरण ढवळून निघाले. नागपूरलाही लोक रस्तोरस्ती खांद्यावर झेंडे घेऊन स्वातंत्र्याचा घोष करीत होते. वर्धा आणि नागपूर यांत फारसे अंतर नसल्यामुळे या सर्व घडामोडींचा माझ्या मनावर परिणाम झाला आणि स्वातंत्र्य आंदोलनात स्वत:ला झोकून देण्यासाठी मी कॉलेजला रामराम ठोकला!

**प्रश्न –** वसमतला आल्यावर म्हणजे सन १९४३ ते १९४७ चा काळ. या काळातील तुमच्या जीवनातील महत्त्वाच्या घडामोडींचा धावता आढावा घ्यायचा ठरला, तर त्या कालखंडातील कोणत्या गोष्टी तुमच्या दृष्टीने महत्त्वाच्या होत्या. या काळात तुम्ही काय साध्य केले?

– मला हातमाग व्यवसायातील कामगारांचा प्रश्न महत्त्वाचा वाटला. दुसऱ्या महायुद्धाच्या परिणामी सूत पुरवठा होत नसे. अनेक जाचक नियम त्यांच्यावर लादले जाऊ लागले. त्यामुळे त्यांची संघटना तयार केली. शेतकरी संघटना तयार झाली. पुढे हैदराबाद मुक्तिलढ्यात या संघटनेने फार मोठे कार्य केले. हे चालू असतानाच लोकांचे वैचारिक प्रबोधनही झाले पाहिजे, म्हणून एक वाचनालय चालवले.

अस्पृश्यता निवारण, बौद्धिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन, व्यायामाची तरुणात आवड निर्माण करणे वगैरे कार्यक्रमांत मी त्या वेळी स्वत:ला गुंतवून घेतले होते. जून १९४७ मध्ये हैदराबाद स्टेट काँग्रेस संमेलनानंतर मात्र कार्याचे स्वरूप एकदम बदलले. भारताला स्वातंत्र्य मिळूनही ब्रिटिशांच्या आशीर्वादाने चालणारे निझामाचे हैदराबाद राज्य त्यात सामील नव्हते. स्वतंत्र भारताचा झेंडा लावण्यास बंदी होती. त्यातून झेंडा-सत्याग्रहाचे कार्यक्रम संधी मिळेल तेव्हा चालू झाले. जंगलतोड सत्याग्रह सुरू झाले. निझामाचे अत्याचार सुरू झाले आणि सारी सामाजिक शांतताच भंग पावली. त्यासाठी निझामाला जनतेची शक्ती दाखवणे गरजेचे होते. त्यातून शस्त्र चालवण्याची तयारी असणारे सैनिक निर्माण झाले. निझामाच्या शासनाला जमेल त्या पद्धतीने विरोध करायचा या निष्कर्षावर आमचे आंदोलन आले व त्यातून अनेक ॲक्शन्स आम्ही घेतल्या. त्याचा इतिहास आता उपलब्ध झाला आहे.

**प्रश्न –** तुमचा हैदराबाद मुक्तिलढ्याचा ऐन भरातील काळ गांधीजींच्या मृत्यूनंतरच सुरू झाला. गांधीहत्या प्रकरण आता इतिहासजमा झाले आहे. गांधीहत्येला जबाबदार असलेल्या आरोपींमध्ये सावरकरांचेही नाव होते. त्यांची शस्त्रबळावर निष्ठा होती. रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले? असा त्यांचा प्रश्न होता. ज्या क्रांतिकारकांनी या आंदोलनात आपले प्राण पणाला

लावले, त्यांच्या कार्याचे मोल आपण मानता की नाही?

– मानतो. आपण स्वातंत्र्य लढ्याची सुरुवातच १८५७ च्या बंडापासून मानतो. अलीकडे तो विषयही वादग्रस्त होऊ लागला आहे, ते सोडा. पण मी तुम्हाला सांगतो की, क्रांतिकारकांचे कार्य, निष्ठा आणि समर्पण बुद्धी कमी मोलाची मुळीच नाही. पण 'स्वातंत्र्य' या कल्पनेला नैतिक, सामाजिक, आध्यात्मिक आणि राजकीय बैठक गांधीजींनी दिली, असे मला वाटते. केवळ सत्तांतर होणे, म्हणजे स्वातंत्र्य मिळणे नव्हे. आम्हीसुद्धा आंदोलनात हल्ला किंवा प्रतिकार करताना 'महात्मा गांधी की जय' असेच म्हणत होतो. त्या वेळीसुद्धा आम्हाला माहीत होते की, अहिंसात्मक असहकाराची एक नवी शक्ती गांधीजींनी दिली आहे. गांधीजी साधनशुचितेला महत्त्व द्यायचे. अहिंसा हे मूल्य श्रेष्ठच आहे. पण त्यावेळेस ते पेलण्याची आमची कुवत नव्हती म्हणा किंवा कालतत्त्वाला ते मान्य नव्हते, म्हणून म्हणा आम्हाला शस्त्र हाती घ्यावे लागले. याचे उत्तर तुम्हाला गीतेमध्येच नेमके मिळू शकेल. हेतूमध्ये शुद्धता आणि पावित्र्य असले की, कृतीलाही आपोआप ते येते, असे मला वाटते.

**प्रश्न** – दि. १७ सप्टेंबर १९४८ ला हैदराबाद मुक्तिपर्व संपले. साधारणत: १९४७-४८ हा एक वर्षाचा काळ तुमच्या दृष्टीने खडतर व आव्हानात्मक होता. पण तुमचे भावी आयुष्य म्हणजे स्वातंत्र्य आंदोलनापासून ते आजपर्यंतचे लक्षात घेता, तुम्ही सत्तेच्या राजकारणात फारसे रमला नाहीत. गांधीजींनी तर शेवटपर्यंत राजकारणात रस घेतला. गांधी विचारांचा प्रभाव असूनही तुम्ही राजकारणापासून दूर राहण्याचे कारण काय?

– तुम्ही राजकारणाचा अर्थ काय लावता, यावर ते अवलंबून आहे. सामान्यत: आज तरी राजकारणाला त्याचा मूळ अर्थ जाऊन विपरीत अर्थ प्राप्त झाला आहे. सत्ता, स्पर्धा आणि पक्षांतर्गत हेवेदावे असे त्याचे आजचे स्वरूप झाले आहे. सत्तेची मी मुळीच चव चाखली नाही, असे नाही. वसमत नगरपालिकेचा पहिला लोकनियुक्त अध्यक्ष म्हणून माझी नोंद झाली आहे, हे तुम्हाला माहीत असणारच. ती स्थानिक स्वराज्य संस्थेची पहिली निवडणूक होती. त्या वेळी मी आणि माझे सहकारी यांनी मिळून पक्षनिरपेक्ष राहून स्थानिक विकासाच्या प्रश्नाला प्राधान्य देणारा नागरिक संघ स्थापन केला आणि त्या वेळी निवडावयाच्या १५ जागांपैकी १४ जागांवर आमचे उमेदवार निवडून आले होते. तो योगायोग होता. ते माझे ध्येय नव्हते.

सप्टेंबर १९४८ पासून ते नगराध्यक्ष होईपर्यंतच्या काळात माझा सेवादलाशी संबंध आला. त्या वेळी एस्. एम्. जोशी राष्ट्र सेवादलाचे काम करायचे. १९५० मध्ये साने गुरुजी गेले. त्यांच्या वाङ्मयाचा मी तर उपासकच होतो, असे म्हटले तरी चालेल. कारुण्य आणि दया ही दोन श्रेष्ठ जीवन मूल्ये आहेत, याचा प्रत्यय मला त्यांचे वाङ्मय वाचून आला. विचार कितीही चांगले असले तरी, त्याला जोपर्यंत कार्यक्रमाची जोड मिळत नाही, तोपर्यंत ते कल्पनाच ठरतात. म्हणून काही उपक्रम सेवादलाच्या वतीने आयोजित केले. रस्ते बांधणे, पाझर तलाव, ग्रामीण भागात शौचालयाचा प्रसार करणे वगैरे कार्यक्रम त्या काळी अनुयायांच्या मदतीने राबवले.

तुम्ही आत्ताच म्हणालात, 'गांधीजींनी शेवटपर्यंत राजकारणात रस घेतला आणि तुम्ही राजकारणापासून दूर कसे?' स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेस विसर्जित करावी, असा मनोदय गांधींनी व्यक्त केला होता, हा इतिहास तुम्हाला कदाचित माहीत असेल. परकीय सत्ता गेली. स्वराज्य आले. सुराज्याकडे वाटचाल करायची. केवळ काँग्रेस विसर्जित करावी, एवढाच त्यांचा मनोदय नव्हता, तर आता बाकीचे आयुष्य कुष्ठरोग्यांची सेवा आणि निसर्गोपचाराच्या प्रसारात घालवावे अशीही त्यांची इच्छा होती. पण नियतीची तशी इच्छा नव्हती. त्यांना पुढे जास्त आयुष्य लाभले नाही आणि आज गांधीजींचे नाव घेऊन राजकारण कसे चालते, हे मी सांगण्याचे कारण नाही! गांधी विचारांचा प्रभाव असूनही राजकारणापासून दूर का आहे? हे स्पष्ट झाले ना! उलट गांधी विचारांच्या प्रभावामुळेच मी राजकारणापासून दूर आहे.

**प्रश्न** – तुमच्या जीवनाच्या सामाजिक कार्याचे तीन पर्व समजले, तर पहिले पर्व म्हणजे तुमच्या स्वातंत्र्य आंदोलनातील सहभागाचे, दुसरे राष्ट्र सेवादलाच्या कार्यातील सहभागाचे आणि तिसरे सर्वोदय आंदोलनाचे. या तीन पर्वातील तुमचा सहभाग एका पर्वातले काम संपल्यामुळे दुसरे स्वीकारले अशा पद्धतीचे आहे का, स्थल-काल-परिस्थितीनुसार तुम्ही कार्यक्रमात बदल केले?

– स्थल-काल-परिस्थितीनुसार बदल केला हे फक्त पहिल्या भागापुरते म्हणता येईल. स्वातंत्र्य आंदोलनातील सहभाग संपला की, आपले कार्य संपले, असे मानणे हे खऱ्या कार्यकर्त्यांचे लक्षण नव्हे! पण स्वातंत्र्य आंदोलनात

सहभागाची ज्या पद्धतीने गरज होती, त्या पद्धतीने तो यथाशक्ती मी नोंदविला. पण समाजजीवनाचा प्रवाह चालू असतो. नव्या समस्या व नवी आव्हाने निर्माण होतात. त्याला जाणतेपणाने तोंड दिला पाहिजे, म्हणून मी माझा सहभाग चालू ठेवला. राष्ट्र सेवादलाचे कार्य आणि सर्वोदयचे कार्य यात मूलत: फारसा फरक नाही. सत्तेविनाही सेवा घडू शकते, हा वस्तुपाठ सेवादलाचा. मी सेवादलाच्या कार्यक्रमात रस घेत असे. पुढे मात्र विनोबांच्या सर्वोदय चळवळीचे मला आकर्षण निर्माण झाले. आर्थिक विषमता नष्ट करायची असेल, तर ग्रामीण कृषिप्रधान अर्थरचनेला व्यवस्थित समजून घेतले पाहिजे. उत्पादनाच्या सर्व साधनांत जमिनीलाच केवळ मर्यादा असल्याने जमिनीच्या स्वामीत्वाचा संदर्भ बदलला पाहिजे. या दृष्टीने विनोबांनी भूदान चळवळ सुरू केली, त्याचा मी अभ्यास केला.

**प्रश्न** – विनोबांच्या ग्रामदान-भूदान आंदोलनाशी तुमचा प्रत्यक्ष संबंध कसा आला? चळवळीचा जर तुम्ही अभ्यास केला, तर तुम्हाला त्यातील उणीवा अथवा मर्यादा जाणवल्या असणारच. ही चळवळ आतापर्यंत समाजापरिवर्तनाच्या ज्या चळवळी झाल्या त्यापेक्षा कोणत्या कारणांमुळे अधिक निर्दोष वाटली?

– कोणतीही चळवळ एकदम सदोष किंवा निर्दोष अशा सदरात मोडत नाही. ती उभारण्याचा हेतू, कार्यकर्त्यांची समर्पण बुद्धी, प्रस्थापित व्यवस्थेशी मुकाबला करण्याची तिची क्षमता या सर्वांचा एक समयावच्छेद करून तिची यशस्विता ठरते. आर्थिक क्रांती घडविण्याचे आतापर्यंत अनेकांचे अनेक प्रयत्न झाले. आंध्रातील कमयुनिस्टांच्या भूमी आंदोलनातूनच विनोबांनी अहिंसक मार्गाने आर्थिक परिवर्तनाचा पाया घातला. दि. १८ एप्रिल १९५१ च्या पोचमपल्लीच्या भूमिदानापासून या आंदोलनाची सुरुवात मानली जाते.

१९५१ पासून सुरू झालेली विनोबांची पदयात्रा १९५८ साली महाराष्ट्रात आली आणि त्याच साली तिने मराठवाड्यात प्रवेश केला आणि राष्ट्र सेवादलाने माझ्यावर या आंदोलनाची जबाबदारी सोपवली व त्यात मी माझा अधिकात अधिक वेळ देऊ लागलो. तुमच्या प्रश्नाच्या उत्तर भागात या आंदोलनाच्या मूल्यमापनाच्या संदर्भात जी शंका तुम्ही उपस्थित केली, त्याचे उत्तर मी सुरुवातीलाच दिले आहे. ही चळवळ मला अधिक निर्दोष यासाठी वाटते की, यात कोठेही हिंसेला वाव नाही. वैचारिक परिवर्तनावर विश्वास ठेवीत असल्यामुळे मला ती अधिक निर्दोष वाटली.

**प्रश्न** – आणीबाणीच्या काळात तुम्हाला १८ महिन्यांचा तुरुंगवास भोगावा लागला. त्या वेळी इंदिरा गांधी सत्तेत होत्या. तुमच्या राजकीय विचारांच्या बैठकीला समाजवादी विचारांची चौकट. इंदिरा गांधी काँग्रेसच्या पुढे आणीबाणी संपल्यानंतर ज्या निवडणुका झाल्या त्यात तुम्ही उघडपणे काँग्रेस उमेदवारांच्या विरुद्ध आणि जनता पक्षाच्या उमेदवारांचा प्रचार केला. आतापर्यंतच्या तुमच्या निष्पक्ष विधायक कार्यकर्त्यांच्या भूमिकेशी ही भूमिका विरोधी नव्हती काय?

– नाही. आणीबाणीनंतरच्या निवडणुकीचा प्रचार म्हणजे केवळ पक्षीय राजकारणाचा विचार नव्हता. काँग्रेसमधून एक गट बाहेर पडला होता व तोही स्वत:ला खरी काँग्रेस समजत होता. बाकी सारे छोटे-मोठे पक्ष एक होऊन जयप्रकाशजींच्या अधिपत्याखाली केवळ 'जनता पक्ष' म्हणून स्थापन झाला. जनता पक्षाच्या उमेदवाराचा प्रचार असे ते चित्र होते. त्यामुळे त्या निवडणूक प्रचारात भाग घेतला.

**प्रश्न** – आतापर्यंत आपल्या कार्याची जी दिशा आहे, व ज्या आत्मनिष्ठेने ते चालू आहे, त्याचा समाजावर तुम्हाला अभिप्रेत असलेला काही परिणाम झाला आहे, असे वाटते का? नसेल तर त्याच्या मूल्यमापनाची आणि आत्मपरीक्षणाची गरज आहे, असे तुम्हाला वाटत नाही काय?

– मूल्यमापन आणि आत्मपरीक्षण ही सतत चालू राहणारी प्रक्रिया आहे. माझ्या कार्याचे मूल्यमापन समाजानेही केले आहे व संस्थांनाही केले आहे, असे मला वाटते. स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाने मला डॉक्टरेट ही सन्माननीय पदवी बहाल केली, मराठवाडा भूषण पुरस्कार मिळाला. याचा अर्थ निदान माझ्या कार्याची दिशा व वाटचाल योग्य मार्गाने चालू आहे, असे तुम्हाला वाटत नाही काय?

**प्रश्न** – तुम्हाला मिळालेले सन्मान व पुरस्कार याबद्दल अगदी थोडक्यात भाष्य करायची विनंती केली, तर आपण काय सांगणार?

– पुरस्कार किंवा सन्मान गौण असतात किंवा ती केवळ प्रतिकात्मक असतात. आत्मनिष्ठेने स्वीकारलेले कार्य पुरस्काराचे ध्येय समोर ठेवून चालू नसते. कार्य करणाऱ्याची निष्ठा आणि सातत्य याचा तो एक अनुषंगिक

परिणाम आहे, एवढेच म्हणता येईल.

**प्रश्न –** तुमच्या कार्यातील तुमच्या मित्रपरिवाराची काही नावे आठवतात काय?

– कोणतेही सामाजिक कार्य अनुयायी व मित्रपरिवाराशिवाय होत नाही. स्वातंत्र्य आंदोलनातील बरेच मित्र आता काळाच्या पडद्याआड गेले आहेत. बऱ्याच जणांचा स्वातंत्र्य आंदोलनानंतर सामाजिक कार्याशी संबंध सुटला. मोजकेच शिल्लक आहेत. त्यांच्या स्मृती मी माझ्या भावविश्वात जपून ठेवल्या आहेत.

**प्रश्न –** आता थोडे खासगी व व्यक्तिगत जीवनाविषयी विचारतो. आपण काही समाजाचे देणे लागतो, ही जाण असणे उत्तम, पण त्याचबरोबर आपल्या काही कौटुंबिक जबाबदाऱ्या आहेत, त्याही पूर्ण झाल्या पाहिजेत, असे त्या वेळी आपणाला वाटत होते किंवा नाही? त्या आपण पार पाडल्यात का? दोन्हीमध्ये आपण प्राधान्य कशाला दिले?

– तसे पाहिले तर, कोणतीही 'जबाबदारी' म्हटली की, ती महत्त्वाचीच असते. सुदैवाने माझ्यावर कौटुंबिक जबाबदारीचा फारसा बोजा पडला नाही, पण हळुवार भावनांच्या कोशातून आणि मायामोहाच्या पाशातून स्वत:ची सुटका करून घेतल्याशिवाय निष्ठा म्हणून स्वीकारलेले कार्य सिद्धीस जात नाही.

**प्रश्न –** ईश्वरनिष्ठा किंवा परमेश्वराचे अस्तित्व यासंबंधी तुमचे काही चिंतन असेलच. गांधी-विनोबांच्या विचारांचा आपल्यावर प्रभाव असल्यामुळे आपण ईश्वर मानणारेच असणार. नास्तिकवाद तुम्हाला अमान्य असणार, अशीच माझ्यासारख्या तुमच्या निकटवर्तीयांची समजूत आहे. मी जर तुम्हाला 'देव' आहे का असा सरळ प्रश्न विचारला तर?

– तर तो आहे, असेच मी उत्तर देईन. पण त्याचे रूप किंवा स्वरूपाबाबत सांकेतिक असे कोणतेच चित्र माझ्यासमोर नाही. मूर्तीला हात जोडल्याने एखाद्याची आस्तिक्यबुद्धी सिद्ध होते असे मी मानत नाही. तसेच मूर्तीला हात जोडू नयेत असेही सांगणार नाही. माणसातील चांगूलपण जतन करायला लावणारी प्रेरणा म्हणून ईश्वराचे अस्तित्व मला मान्य आहे व त्यासाठीच प्रार्थनेचीही जरुरी आहे.

**प्रश्न –** तुम्ही देव माना की न माना, पण आमच्या-सारख्या तुम्हाला जवळून पाहिलेल्यांना मात्र तुम्ही खरे देवभक्त आहात असे वाटते. कारण लोक तुम्हाला कंटाळत नाहीत, तुम्ही लोकांना कंटाळत नाही. आता तुमच्या जीवनातील आठ दशकांचा काळ उलटून गेला आहे. तेव्हा गीतेच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे 'एकांताविषयी प्रीती जनसंगात नावड' अशी अवस्था केव्हा स्वीकारणार?

– मला वाटते, एकांत म्हणजे आत्मचिंतन आणि लोकांत म्हणजे कार्यक्रम. कार्यक्रम आणि आत्मचिंतन माझे एकाच वेळी चालू असते.

**प्रश्न –** विनोबांनी 'क्षेत्रसंन्यास' असा एक शब्दप्रयोग केला होता. क्षेत्रसंन्यास म्हणजे भ्रमंती बंद करून एकाच ठिकाणी राहून कार्य करणे. तसा आपण क्षेत्रसंन्यास केव्हा घेणार?

– संन्यास या शब्दाचा अर्थ फार व्यापक, खोल आणि गहन आहे. केवळ भगव्या कपड्यांमुळे जसा संन्यास सिद्ध होत नाही, तसा कार्यमुक्तीमुळेही संन्यास सिद्ध होत नाही. जोपर्यंत शरीराकडून काम होते, तोपर्यंत ते त्याच्याकडून करून घ्यायचे आणि त्याचे फळ समाज-पुरुषाचे चरणी अर्पण करायचे हाच माझा क्षेत्रसंन्यास.

**प्रश्न –** अनेक जणांना जीवनाच्या अंतिम टप्प्यात वैफल्याच्या भावनेने ग्रासलेले असते. तुमच्यासारख्या ध्येयवादी कार्यकर्त्याला वाटते, आपल्या विचारांचा समाजावर प्रभाव पडत आहे. पण जग जिथल्या तिथेच असते. मला वाटते, अशा भावनांचे कल्लोळ तुमच्या अंतरंगात उठत असणार. मनाला निराशेने कधी स्पर्श केला काय?

– नाही. 'नित्यतृप्त निराधार न राखे फलवासना' अशा वृत्तीने कार्य केले की, निराशा येत नाही.

**प्रश्न –** अंतिम इच्छा?

– जय-जगत.

संवादक : ॲड. रमेश कोठीखाने
Mob. 9403219447

२००७ मध्ये घेतलेली ही मुलाखत शाम अग्रवाल लिखित 'पदयात्रा' या पुस्तकातून संक्षिप्त करून घेतली आहे. ७ जानेवारी २०१८ रोजी गंगाप्रसादजींनी ९६ व्या वर्षात पदार्पण केले आहे.